# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/०६/२०१९
## दि.१४/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४३४/१९,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | सुधाकर क्षिरसागर,वय ३७ वर्ष,रा. आळंदी रोड, पुणे |
| **आरोपी** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०६/२०१९ रोजी ०१/३५ वा.चे सुमारास येरवडा क्षेत्रिय कार्यालयाच्या पुढे बस स्टॉपजवळ येरवडा पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे मोटर सायकल वरुन, त्यांचे मालक मुकेश गोयल यांनी त्यांना व्हॉटसअप व्दारे पाठविलेल्या मेसेज प्रमाणे विश्रांतवाडी, शांतीनगर, प्रतिकनगर, नागपुरचाळ, बिडीकामगार येरवडा, राज चौक,येरवडा,पुणे, कंजारभाट येरवडा, गोल्फ क्लब चौक इत्यादी ठिकाणचे विविध व्यवसायीक यांचेकडुन वेगवेगळी रक्कम जमा करुन, ती सुमारे ३,११,८००/- रुपये एक काळया रंगाची सॅकबॅगमध्ये घेवुन कोरेगांव पार्ककडे मोटर सायकल वरुन जात असताना, येरवडा क्षेत्रिय कार्यालयाच्या पुढे बसस्टॉपजवळ दुपारी ०१/३५ वा.चे सुमारास, चार अनोळखी इसम पैकी एक इसम फिर्यदी यांचे गाडी समोर आला व त्यांना म्हणाला " माझ्या अंगावर गाडी का घातली ? असे म्हणुन त्यांचे बरोबर भांडणे करु लागला व त्याच दरम्यान त्याचे तीन साथीदार फिर्यादी यांचे पाठीमागुन आले व त्यातील दोघेजण फिर्यादीकडील रोख रक्कम असलेली सॅकबॅग जबरदस्तीने घेवु लागल्याने फिर्यादी यांनी त्याचे सोबत झटापटीकरीत असताना त्यातील एक जणाने काही तरी कठीन वस्तुने फिर्यादी यांचे डोक्यात जोरात मारुन, त्यांना जखमी केले व त्यांच्याकडील सॅकबॅग मध्ये असलेली रोख रक्कम व दोन मोबाईल असा एकुण कि.रु. ३,१७,८००/- असा जबदस्तीने चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मंगेश भांगे ८८०५३३३०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १९६/१९,भादविक १४३,१४७,१४८, ४५२,३२३,५०६,४२७, |
| **फिर्यादी** | भिमराव साठे,वय- ४२ वर्षे,रा. कात्रज- कोंढवा रोड, पुणे |
| **आरोपी** | १) बसवेश्वर आनंद ख्याले, वय- २४ वर्षे, रा. बी/७४/६, सुप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे २) किरण बबन जाधव, वय-३२ वर्षे, धंदा- चालक, रा. बी/५२/१०, सुप्पर इंदिरानगर, बबवेवाडी, पुणे ३)मंगेश रमेश हांडे, वय २४ वर्षे,रा.सदर ४)एक विद्यीसंघर्षीत बालक व इतर एक (अ.क्र.१ ते ३ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.चे सुमारास सर्व्हे नं.६४८, पवन नगर, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळ व ठिकाणी, जनसंपर्क कार्यालयात फिर्यादी यांचे कार्यकर्ते नितीन साठे, सुरज आंब्रे, आण्णा उघडे व दिपक धडे हे थांबले असताना,फिर्यादी ओळखत असलेले अप्पर भागात राहणारे यातील नमुद इसम यांनी फिर्यादी यांचे ऑफिसमध्ये येवुन, कार्यकर्त्यांना तुमचे साहेब कोठे आहेत त्यांचा नंबर द्या असे म्हणुन टेबल वरील काच फोडून कार्यकर्त्यांना हाताने मारहाण करुन, बसवेश्वर ख्याले याने माझ्याकडे पाहत नाहीत असे म्हणुन तुमच्याकडे बघुन घेतो अशी धमकी देवुन पुन्हा सायंकाळी ०४/३० वा.चे सुमारास बसेवेश्वर ख्याले हा धारदार हत्यार घेवुन, फिर्यादी यांना भिती दाखवण्याचे उद्देशाने त्याचे एका साथिदारासह फिर्यादी यांच्या ऑफिसवर येवुन ऑफिसचा दरवाजा ठोठावुन फिर्यादी यांना भिती दाखवुन दुचाकीवरुन निघुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.एम.वाघमारे ९३७१०७१९२० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे २५२/१९,भादविक ४९८(अ),३०६, ३२३,५०४ |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर लाड, वय ३१ वर्षे,रा.बिडकिन ता.पैठण, जि.औरंगाबाद |
| **आरोपी** | सागर सदाशिव थोरात, वय ३५ वर्षे,रा.खुळेवाडी लक्ष्मी माता मंदीराचे जवळ चंदननगर पुणे. (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जानेवारी २०१० ते दिनांक १०/०६/२०१९ रोजी दरम्यान खुळेवाडी लक्ष्मी माता मंदीराचे जवळ चंदननगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्याद यांची बहिणी सौ.संगिता सागर थोरात, वय ३० वर्षे,रा.खुळेवाडी लक्ष्मी माता मंदीराचे जवळ, चंदननगर, पुणे. ही लग्नानंतर जानेवारी २०१० पासुन खुळेवाडी चंदननगर पुणे येथे तिचे सासरी पती सागर सदाशिव थोरात, यांचे बरोबर नांदत असताना तिचा पती सागर थोरात याने बहिण सौ.संगिता थोरात हिचे चारीत्र्यावर संशय घेवुन, घरगुती कारणांवरुन तिला नेहमी शिवीगाळ व हाताने मारहाण करुन, रात्री अपरात्री तिला तिचे मुलांसह घराचे बाहेर हाकलुन देवुन, तिचा शारीरीक व मानसिक छळ करीत असल्याने त्या त्रासाला कंटाळुन जावुन, फिर्यादी यांची बहिण सौ.संगिता सागर थोरात,वय ३० वर्षे हीने दिनांक १०/०६/२०१९ रोजी तिचे राहते घरामध्ये लोखंडी पाईपाला साडीने गळफास लावुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.ए.चाऊस ८८०६१६६१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४३५/१९,भादविक २७९,३३८,३०४(अ),सह मो.व्हे.ॲ. कलम १८४, १८५, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | त्रिशिका पाडळे,वय १८ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | नागप्पा शिवशरणाप्पा बुगडे,वय ४५ वर्षे, रा.एरंजी, ता.बसवकल्याण,जि.बिदर कर्नाटक राज्य (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/०६/२०१९ रोजी १३/०० वा.चे सुमारास नारायण स्विट मार्ट दुकानासमोर आंबेडकर चौकाजवळ, येरवडा, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी त्रिशिका पाडळे ही तिची मैत्रिण कु.श्रुती विजय रणसिंग,वय १९ वर्षे, हिचेसह डॉ.आंबेडकर कॉलेज जय जवाननगर,येरवडा येथे इयत्ता १२ वी ची मार्कसिट आणनेसाठी रस्त्याचे कडेने पायी जात असताना, यातील नमुद इसम नागप्पा शिवशरणाप्पा बुगडे, याने त्याचे ताब्यातील ट्रक हा गोल्फ क्लब चौकाकडून आंबेडकर चौकाकडे चालविताना तो दारुच्या नशेत रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, अविचाराने हयगयीने स्वतः चे व दुसऱ्याचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने बेदकारपणे चालवून, त्रिशिका व श्रुती यांना धडक देवून, श्रुती विजय रणसिंग,वय १९ वर्ष, हिस गंभीर जखमी करून, तिचे मृत्यूस कारणीभुत झाला व फिर्यादी त्रिशिका पाडळे, वय १८ वर्षे, हिला व ट्रक क्लिनर आखिल संजु मामुली यांना गंभीर जखमी करणेस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आनंद सिंग साबळे ८६९८३२१७१७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५६१/१९,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | अक्षय गाडगीळ, वय-३४ वर्षे, रा.कर्वेनगर पुणे |
| **आरोपी** | १)एक पुरुष २)एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०३/२०१८ रोजी ते दि.१८/१०/२०१८ रोजी दरम्यान पी.एन.जी.ब्रदर्स शॉप नं.१, सुप्रिम सेंटर, आयटीआय रोड, औंध पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पुणे शहरात वेगवेगळया ठिकाणी तसेच नाशिक येथे सोने, चांदी व हिरे खरेदी विक्रीचा व्यवसाय असुन, वर नमुद ता वेळी व ठिकाणी, यातील नमुद एक पुरुष व |

|  |  |
|---|---|
|  | एक महिला यांनी वेळोवेळी दुकानात येवुन आणखी सोने खरेदी करावयाचे आहे असे आमिष दाखवुन डोंबिवली येथील जागा विक्री केले नंतर सर्व पैसे व्याजासह देतो असे खोटे आश्वासन देवुन, सोन्याचे वेगवेगळे दानिगे, सोन्याचे बिस्किट तसेच डायमंडची अंगठी, चांदीचे दागिने  असे एकुण २५,६९,९६०/-रु.चे दागिने खरेदी करुन,फिर्यादी व त्यांचे व्यवस्थापक यांचा विश्वास संपादन करुन, त्यांना नुकसान पोहचविण्याच्या इराद्याने संगनमत करुन, स्वतःचा फायदा व्हावा या उद्देशाने फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.जाधव  ९५५२५५२२५४ |

**६**

|  |  |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २९६/१९,भादविक ४८९(अ)(ई) |
| **फिर्यादी** | रोहनकुमार सिंग, वय ३८ वर्षे,रा.रोहनलेहर बाणेर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | नोव्हेंबर २०१६ मध्ये  युनियन बँक ऑफ इंडिया, उधोग भवन सी ब्लॉक टिळक रोड, शाखा पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद बँकेमध्ये चिफ मॅनेजर म्हणुन नोकरीस असुन, वर नमुद केले कलावधीमध्ये फिर्यादी यांचे युनियन बँक ऑफ इंडिया, उधोग भवन सी ब्लॉक टिळक रोड, शाखा पुणे या बँकेमध्ये कोणीतरी अनोळखी इसमाने बँकेच्या कामकाजाच्या वेळेत येवुन, एकुण ५,९४,७४८ /- रु.च्या नोटा या खऱ्या आहेत असे भासवुन त्या बनावट नोटांचा भरणा बँकेत करुन, बँकेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. डी.आर.गभाले    ९४०४७२२८७७ |

## दि.१५/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

|  |  |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ५६२/१९,भादविक ३९५ |
| **फिर्यादी** | सत्यजीत तुपे, वय ३५ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | ६ ते ७  अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०६/२०१९ रोजी २३/०० वा.चे सुमारास पीएमसी मैदान भोसलेगार्डन, हडपसर,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी व त्यांचे मित्र असे हॉलीबॉल खेळत असताना, एक इसम ॲक्टीव्हा गाडी घेवुन ग्राऊंडवरती आल्याने फिर्यादी यांनी त्याला ग्राऊंडवर गाडी का घातली असे म्हणला असता नमुद इसमाने त्याचे इतर मित्रांना फोन करुन बोलावुन, त्यांनी फिर्यादी यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन, त्यापैकी एकाने कोयता काढुन फिर्यादी यांचे उजवे हाताचे मनगटावर, उजवे बाजुला छातीवर व पाठीवर कोयत्याने सहायाने मारहाण करुन, जबर जखमी करुन, तसेच फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातील २ हजार ५००/- रु. जबरदस्तीने काढुन घेवुन, मारण्याची धमकी दिली तसेच फिर्यादी यांना वाचविण्यासाठी आलेल्या विनोद रासकर यालाही मारहाण केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मनोज पाटील ९८५०१५१८०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**